# मा. महापालिका आयुक्त यांचा ठराव क्र. ६/४५३ दि. ८/९/२०२२ #

<table>
<tr><td colspan="2"><u>पुणे महानगरपालिका निविदा कार्यप्रणाली प्रपत्र</u></td></tr>
<tr><td>अ.क्र</td><td>निविदा अटी शर्ती बाबत करावयाची कार्यवाहीसाठी सुचना</td></tr>
<tr><td></td><td>महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची "ड" प्रकरण ५ मधील २ (१) मध्ये नमूद केल्या प्रमाणे २.०० लाख पेक्षा अधिक खर्च होणार असेल तर ई-निविदा प्रक्रिया करण्यात यावी.<br>कोटेशनकरीता–मआ/मुले/१८४५. दि. १४/१२/२०११ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.</td></tr>
<tr><td>१.</td><td><u>ई निविदा प्रसिद्धी</u><br>१.१ जाहिरात धोरणास मा.स्थायी समिती ठराव क्रमांक २०९० दि.०८/०१/२०१९ अन्वयेप्राप्त झालेल्या मान्यतेनुसार</td></tr>
<tr><td></td><td>१.२ ई निविदा प्रसिद्धी यापुढे mahatenders.in या NIC च्या व शासनाने विशिष्ट आदेश दिल्यास योग्य त्या web portal वर प्रसिद्ध कराव्यात. केंद्र शासनाने मंजूर केलेल्या कामांसाठी केंद्र शासनाच्या प्रसिद्धी निकषांचे अनुपालन करावे.</td></tr>
<tr><td>२.</td><td><u>ई निविदा प्रसिद्धीचा कालावधी</u><br>२.१ निविदा प्रसिद्धीचा किमान कालावधी खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे असावा :-</td></tr>
</table>

| अ.क्र. | कामाची किंमत | प्रथम वेळ | द्वितीय वेळ (फेर निविदेसाठी) | तृतीय वेळ (फेर निविदेसाठी) |
|---|---|---|---|---|
| १. | रु.२लक्ष ते रु.१ कोटी | १० दिवस | ८ दिवस | ७ दिवस |
| २. | रु.१ कोटी ते रु.५ कोटी | १५ दिवस | १० दिवस | ७ दिवस |
| २. | रु.५ कोटी ते रु.२५ कोटी | २५ दिवस | १५ दिवस | १० दिवस |
| ३. | रु.२५ कोटी ते रु.१०० कोटी | २५ दिवस | २५ दिवस | १५ दिवस |
| ४. | रु. १०० कोटी आणि त्यावरील फिडीक/ SBD (Standard Bid Document) | ४५ दिवस | ३० दिवस | १५ दिवस |

**टिप:- प्रस्तुतचे दिवस हे सुट्टीसह असल्याने कालावधीमध्ये कार्यालयीन दिवसांसह सुट्ट्या अंतर्भूत आहेत.**

१) निविदा प्रसिद्धीचा प्रथम प्रसिद्धी कालावधी काही कारणास्तव कमी करावयाचा झाल्यास तसा प्रस्ताव खाते प्रमुखांनी विषयानुरूप मा. अति महापालिका आयुक्त/ मा.महापालिका आयुक्त यांचेकडे पाठवावा व पूर्वमान्यता घ्यावी. मात्र किमान कालावधी ७ दिवस इतका राहील.

२) अतिमहत्वाच्या जसे कि हेलिपॅड, निवडणूक विषयक कामे, मा.राज्यपाल तसेच अन्य अति महत्वाच्या व्यक्तींच्या दौऱ्यासंदर्भात अन्य कामे व जनजाती क्षेत्रातील रु.१ कोटी पर्यंत कामांचा निविदा प्रसिद्धीचा कालावधी ३ दिवस इतका राहील.

अतिरिक्त सूचना :-

१. अत्यंत अपवादात्मक परिस्थिती मध्येच मा.महापालिका आयुक्त यांचे मान्यतेने अल्प मुदतीची निविदा काढण्यात यावी. व सदर निविदेचा कालावधी ७ दिवस असावा.
२. काही अपरिहार्य कारणास्तव निविदा मुदत वाढ ( फेरनिविदा नाही ) द्यावी लागली तर तो कालावधी त्याच्या स्तरावर निश्चित करावा व त्याप्रमाणे शुद्धिपत्रक प्रसिद्ध करावे. वरील कोष्टकामध्ये द्वितीय व तृतीय वेळेचा नमुना कालावधी हा फक्त फेरनिविदेसाठी नमूद केला गेला आहे.
३. निविदेला मुदतवाढ द्यावी लागल्यास Tender id _1 असाच राहील व फेर निविदा काढल्यास Tender id _2 असा बदलेल व परत फेरनिविदा काढल्यास Tender id _3 असा बदल होईल.
४. फेरनिविदा मागविल्यास किंवा मुदतवाढ दिल्यास निविदा क्रमांक बदलणार नाही याची दक्षता खात्याने

(डॉ. कुणाल खेमनार) भा.प्र.से.
अतिरिक्त महापालिका आयुक्त(इस्टेट)
पुणे महानगरपालिका



(व्ही. जी. कुलकर्णी)
मुख्य अभियंता
पथ विभाग
पुणे महानगरपालिका

घ्यावी.

२.२ निविदा प्रारूप व त्यातील सर्वसाधारण अटी

सदर नुसार अटी शर्तीस मा.महापालिका आयुक्त / मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त यांची मान्यता प्राप्त झाल्यानंतर, मान्य अटी शर्ती नुसार खात्यामार्फत SBD (Special Bid Document)निश्चित करणे व मा.खातेप्रमुख यांची मान्यता घेणे आवश्यक.

२.३ प्रारूप निविदा मंजुरीचे अधिकार :

मआ /मुले १२९६ दि.११/१०/२०११ अन्वये खालील तरतूद

उपरोक्त संदर्भ क्र. ४ मध्ये नमूद केलेल्या सुधारणेस अनुलक्षून महापालिका आयुक्त यांना असलेले अधिकार पुढीलप्रमाणे सुपूर्द करण्यांत येत आहेत.

| अ. क्र. | प्राधिकारी | अर्थसंकल्पीय तरतुदीस अधीन निविदा मान्य मर्यादा रक्कम |
|---|---|---|
| १ | मा.अति.महा.आयुक्त (जनरल/विशेष) | --- |
| २ | खातेप्रमुख/अधीक्षक अभियंता<br>१. तांत्रिक<br>२.प्रशासकीय | रुपये १० लाख ते २५ लाखापर्यंत |
| ३ | क्षेत्रिय आयुक्त | रुपये ५ लाख ते १० लाख पर्यंत |
| ४ | क्षेत्रिय अधिकारी | रुपये १ लाख ते ५ लाख पर्यंत |
| ५ | कार्यकारी अभियंता | रुपये १ लाख ते १० लाख पर्यंत |
| ६ | उप अभियंता | रुपये १ लाख पर्यंत |

र.रु. २५ लक्ष वरील निविदा मा. महापालिका आयुक्त व मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त ज/वि/ई यांचेमार्फत मा. स्थायी समिती यांचेकडे मान्यतेसाठी सादर होतात.

२.४ प्रारूप निविदा प्रपत्रामध्ये सुधारणा करणे.

अटी शर्तीस मा.महापालिका आयुक्त / मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त यांची मान्यता प्राप्त झाल्यानंतर, मान्य अटी शर्ती नुसार खात्यामार्फत (Standard Bid Document) निश्चित करणे व मा. खातेप्रमुख यांची मान्यता घेणे आवश्यक. SBD(Standard Bid Document) मधील बाबीत बदल करावयाचा असल्यास पूर्वगणित निविदा रक्कम (Estimate cost put to tender) रु. २५ कोटी पर्यंतच्या कामास संबंधित मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त व रु. २५ कोटी पेक्षा जास्त करिता मा.महापालिका आयुक्त यांची मान्यता घेण्यात यावी.

२.५ निविदा पूर्व बैठक (प्री बीड MEETING)रु.१.५० कोटीपेक्षा जास्त रकमेच्या विशेषस्वरूपाच्या निविदांकरीता आयोजित करण्यात यावी.

| अ. क्र. | मुद्दा | सुधारित कार्यपद्धती |
|---|---|---|
| १. | निविदा पूर्व बैठक | निविदा पूर्व बैठक निविदा सादर करावयाच्या अंतिम दिनांकाच्या कमीत कमी ७ दिवस अगोदर घेणे आवश्यक आहे. |

(व्ही. जी. कुलकर्णी)
मुख्य अभियंता
पथ विभाग
पुणे महानगरपालिका

(डॉ. कुणाल खेमनार) भा.प्र.से.
अतिरिक्त महापालिका आयुक्त(इस्टेटस्)
पुणे महानगरपालिका

254

| | | |
|---|---|---|
| २. | सी.एस.डी.(Common Set of Deviations) निर्गमित करणे. | निविदा पुर्व बैठकी नंतर शक्य तितक्या लवकर सक्षम प्राधीकारीच्या मान्यतेने सी.एस.डी.(Common Set of Deviations) निर्गमित करावी. तसेच, सदर सी.एस.डी.(Common Set of Deviations) निर्गमित हा निविदेचा भाग राहील. |

असे निदर्शनास आले आहे की काही वेळा निविदा पूर्व बैठकीस प्रारूप निविदा मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांऐवजी निम्नस्तरीय अधिकारी उपस्थित राहतात. या निर्णयाद्वारे सूचित करण्यात येते कि, निविदा पूर्व बैठकीस मा.खातेप्रमुखांनी उपस्थित रहाणे अनिवार्य राहील, अपवादात्मक परिस्थितीत मा.महापालिका आयुक्त / मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात येईल. जेणेकरून बैठकीत. उपस्थित होणाऱ्या मुद्यांबाबत त्वरित शंका निरसन/ निर्णय होऊ शकेल.

१. जे निविदा प्रपत्र Portal वर upload केले आहे व विहीत प्रक्रियेनंतर निविदा प्रपत्र विचलनाची(Common set of deviations ) सक्षम प्राधिका-याने मान्य केलेल्या व upload केलेल्या CSDव निविदा अटी व शर्ती प्रमाणेच छाननी करावी. कोणत्याही परिस्थितीत अटी व शर्ती, CSD Upload केल्यानंतर नव्याने निविदा अटी शर्ती समाविष्ट करु नये. एखादी महत्वाची अट / शर्त Uploaded निविदा प्रपत्रात नजरचुकीने अथवा अनावधानाने समाविष्ट करावयाची राहिल्यास, निविदा पूर्व बैठकी आधी अथवा निविदा पूर्व बैठकीचे वेळी " Correction Addendum", जास्तीचे सुधारणा प्रपत्र म्हणून निविदा प्रपत्र विचलन ( Common set of Deviation ) मध्ये सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने तात्काळ समाविष्ट करावे. **सक्षम प्राधिका-याने मंजूर केलेल्या सूचना Uploaded निविदा प्रपत्रात नजरचुकीने / अनवधानाने समावेश करावयाच्या राहिल्यास, अशा सूचना निविदा स्वीकृतीचा कालावधी वाढवून व अटी व शर्तीचा निविदा प्रपत्रात समावेश करुन तदनंतरच निविदा प्रक्रिया पार पाडावी."**

२.६ निविदा संच व त्यासोबतची कागदपत्रे सादर करावयाचे कार्यालय

ई-निविदा पोर्टलवर निविदाबाबत "बीड लॉक" झाल्यानंतर व 'ब पाकीट' उघडल्यानंतर कंत्राटदारांसाठी निविदा सादर करावयाच्या वेळेपासून ०३ कार्यालयीन दिवसात एका प्रतीत हार्ड कॉपी लघुत्तम निविदाधारकाने संबंधित खात्याकडे सादर करणेत यावी.

२.७ इसारा रक्कम (EMD)

इसारा रक्कम Online RTGS / NEFT द्वारे संबंधीत कंत्राटदाराच्या बँक खात्यातून सर्व रक्कमेच्या कामा करीता भरणे बंधनकारक राहील.

i) रु.१.५० कोटीपर्यतची कामे :-निविदा रकमेच्या १%

ii) रु.१.५० कोटी रकमेवरील कामे :-निविदा रकमेच्या ०.५% किवां रु.१.५० लक्ष यापैकी जास्त असेल ती रक्कम

२.८ सुरक्षा ठेव रक्कम (Security Deposit):-

निविदा रकमेच्या ५ % मनपाचे प्रचलित धोरणानुसार ( EMD to be converted in to SD and remaining to be recovered from 1st 3 RA bills)

5% SD- Defect liability period नंतर अदा करण्यात येते. तथापि यामध्ये कामाच्या स्वरूपानुसार खात्यास बदल करावयाच्या असल्यास मा. महापालिका आयुक्त / मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त यांची मान्यता आवश्यक आहे.

(डॉ. कुणाल खेमनार) मा.प्र.से.
अतिरिक्त महापालिका आयुक्त(इस्टेटस)
पुणे महानगरपालिका



(व्ही. जी. कुलकर्णी)
मुख्य अभियंता
पथ विभाग
पुणे महानगरपालिका

२.९ <u>रुपये २.०० लक्ष पेक्षा जास्त रकमेच्या सर्व कामांसाठी खालीलप्रमाणे पात्रता निकष .</u>

| | | | |
|---|---|---|---|
| अ | मागील ५ वर्षातील कंत्राटदाराची कमाल उलाढाल | : | देय असलेल्या कामाच्या वार्षिक किंमतीच्या कमीत कमी ७५ टक्के इतकी असावी.<br>(वार्षिक किंमत) = (कामाची एकूण किंमत)<br>(कामाचा कालावधी वर्षात) |
| ब | मागील ५ वर्षात, कंत्राटदाराने त्याच स्वरूपाच्या तुल्यबळ किमतीच्या, पूर्ण केलेल्या कामाची किमान किंमत. | | देय कामांच्या किंमतीनुसार (प्रचलित दराने)<br>अ.तीन सारख्या पद्धतीची कामे ज्यांची काम निहाय किंमत, बोलाविण्यात आलेल्या निविदेच्या अंदाजित रकमेच्या ४०% पेक्षा कमी नसावी किंवा<br>ब.दोन सारख्या पद्धतीची कामे ज्यांची काम निहाय किंमत, बोलावण्यात आलेल्या निविदेच्या अंदाजित रकमेच्या ५०% पेक्षा कमी नसावी किंवा<br>क.एक सारख्या पद्धतीचे काम ज्याची किंमत,बोलाविण्यात आलेल्या निविदेच्या अंदाजित रकमेच्या ८०% पेक्षा कमी नसावी.<br>(टीप :- बोलविण्यात आलेल्या निविदा रक्कम म्हणजे Estimated cost put to tender) |
| क | देय कामासाठी मांगील ५ (पाच) वर्षापैकी कोणत्याही एका वर्षात ज्या महत्वाच्या परिमाणाच्या बाबी करावयाच्या आहेत त्याचे कमीत कमी परिमाण | : | देय कामातील महत्वाच्या बाबींच्या परिमाणाच्या ३०%. **या बाबतीत, निविदे अंतर्गत महत्वाच्या व आवश्यक (जास्त परिमाण असणा-या कमाल पाच व किमान तीन ) बाबींचे परिमाण नमूद करण्यात यावे व या बाबींची एकूण किंमत निविदा किंमतीच्या ३०% पेक्षा जास्त रकमेची नसावी.** |
| ड | कंत्राटदाराची निविदा भरण्याची सक्षमता (बीड कपॅसिटी) | : | (अेx एनx १.५) – बी<br>जेथे अे - गेल्या ५ (पाच) वर्षातील जास्ती जास्त वार्षीक उलाढाल (चालू दराने)<br>एन-देय कामाचा कालावधी<br>बी- हातातील कामांची किंमत<br>(देय कामांच्या कालावधीतील) |

(व्ही. जी. कुलकर्णी)
मुख्य अभियंता
पथ विभाग
पुणे महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| | ब-याचदा आढळून आले आहे की, एकाच निविदा सूचनेतील बहुसंख्य अथवा सर्व कामांकरीता एकच कंत्राटदार निविदा सादर करतात. अशावेळी कंत्राटदाराचा आर्थिक देकार उघडल्यानंतर बीड़ कॅपॅसिटीच्या पात्रतेनुसार बीड कॅपॅसिटी रक्कमेपर्यंतच्या कामासाठी कंत्राटदारास पात्र ठरविले जाते. ज्यावेळी अशी बाब निदर्शनास येईल त्यावेळी संबंधित कंत्राटदाराने संबंधित प्रादेशिक विभागात सादर केलेल्या सर्व निविदा विचारात घेऊन बीड कॅपॅसिटी परिगणित करुन कंत्राटदाराकडून प्रथम प्राधान्यक्रम घेवून त्यानुसार बीड कॅपॅसिटीच्या मर्यादेपर्यंतच निविदांचे आर्थिक देकार उघडण्यात यावेत.<br>Where **A** = Maximum value of the civil engineering works executed in any one year during the last five years ( **Updated to --------- level** ) taking into account the completed as well as works in progress<br>N=Number of years prescribed for completion of the works for which bids are invited<br>B= Value at ---------- **price level**, of existing commitments and on going works to be completed during the next ----- **years (Period of** completion of the works for which bids are invited.)<br>Note: The statement showing the value of existing commitments and on-going works as well as the stipulated period of completion remaining for each of the works listed should be counter signed by the Engineer-In-Charge not below the rank of an Executive Engineer / Officer in charge.<br>In Support of this, attested copy of Annual Audit Report certified by the Charted Accountant should be produced. and same should be verified by auditor of PMC. | |
| इ ) | देय कामाच्या विशिष्ट स्वरुपानुसार समकक्ष काम कंत्राटदारांनी प्रत्यक्ष केलेले असणे अनिवार्य करण्यात यावे.<br>सबलेट (sublet) केलेली कामे ग्राह्य धरण्यात येऊ नये. | |
| फ) | देय कामांसाठी कंत्राटदाराकडे उपलब्ध असावयाची स्वत:च्या मालकीची यंत्रसामुग्री अथवा स्वंसाक्षांकित व नोटरीकृत भाडेतत्वावर घेतलेली यंत्रसामुग्री व प्रकल्प व्यवस्थापना बाबतची व्यवस्था याचे निकष खातेप्रमुख यांनी प्रत्येक प्रकरणी तपासणी करून निश्चित करावी.<br>कामाच्या स्वरूपानुसार लागणारी यंत्रणा सामुग्री SBD(Standard Bid Document) मध्ये प्रकरण निहाय समाविष्ट करणेची कार्यवाही खाते प्रमुख यांचे मार्फत मान्य करून टाकणे येईल . | |

१. उलाढाल, कामाची किंमत इत्यादीची परिगणना चालू दराने करताना प्रतिवर्षी १०% वाढ विचारात घेण्यात यावी.

२. उपरोक्त (क) नुसार बाबींची निवड करताना देय कामामधील महत्वाच्या व ठळक बाबी विचारात

(डॉ. कुणाल खेमनार) भा.प्र.से.
अतिरिक्त महापालिका आयुक्त(इस्टेटस्)
पुणे महानगरपालिका



(व्ही. जी. कुलकर्णी)
मुख्य अभियंता
पथ विभाग
पुणे महानगरपालिका

घ्याव्यात.
३. हातातील कामांची उर्वरित किंमत बिनचूक व परिपूर्णरीत्या सादर करणे कंत्राटदारांवर बंधनकारक राहील. तसेच, देय कामासाठी निविदा सादर केल्या नंतर पण त्यासंबंधी अंतिम निर्णय होण्यापूर्वी एखादे नवीन काम मिळाल्यास त्यासंबंधीची माहिती त्वरीत सादर करणे देखील कंत्राटदारांवर बंधनकारक राहील. अन्यथा नियमानुसार ते यथोचित कारवाईस पात्र राहतील.
४. उपरोक्त (इ) नुसार निकष निश्चित करताना समकक्ष कामाची व्याख्या निःसंदिग्ध असण्याबाबत दक्षता घ्यावी.
५. कामाच्या करारनाम्यात क्वॉलिफीकेशनचा क्रायटेरिया समाविष्ट केलेला आहे, ही बाब निविदा सूचनेमध्ये स्पष्टपणे नमूद करावी.

**२.९.१:-पंजीकृत कंत्राटदारांबाबत सूचना :-**

**:-अ) रु.१.५० कोटी पर्यंतच्या रकमेच्या निविदांकरीता कंत्राटदार नोंदणी (पंजीकृत)आवश्यक आहे.** भारतातील कोणत्याही शासकीय / निमशासकीय याचे कडील पूर्व नोंदणी असल्याचे वैध प्रमाणपत्र सादर करणे **आवश्यक आहे.**

**:-ब) रु.१.५० कोटीपेक्षा जास्त रकमेच्या निविदांकरीता कंत्राटदार पंजीकृत असण्याची आवश्यकता नाही.**

**२.९.२:- अ) निविदा मागविण्यासाठी पध्दती:-**

बी-१ पद्धतीने , EOI पद्धतीने, EPC तत्वावर व बी २पद्धतीच्या निविदांच्या अंमलबजावणी बाबत मआ /७७४ दि.१४/०९/२०१७ व मआ/द/२७६० दिनांक ०६/०३/२०१८ व या परिपत्रकान्वये कार्यवाही करण्यात यावी.

**अतिरिक्त सुचना :-**

निविदेप्रमाणे खात्यामार्फत विशेष अटीस मा.महापालिका आयुक्त/मा.अति.महापालिका आयुक्त यांचे मान्यता घेण्यात यावी .

२.९.२:-ब) आंतरराष्ट्रीय कंत्राटदार यांची उप कंपनी भारतीय असल्यास निविदेत भाग घेण्याची अट निविदा सूचनेत समाविष्ट करावी. यास व्यापक स्तरावर प्रसिद्धी देवून तसेच प्रत्येक निविदेमध्ये सर्व कंत्राटांसाठी पात्रता निकष निश्चित करण्यात येवून सर्व निकषांप्रमाणेच कंत्राटदारांना पात्र/अपात्र ठरविण्यात यावे. तसेच अपात्रतेची कारणे संकेत स्थळावर प्रसिद्ध करुन अशा अपात्र कंत्राटदारांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी ५ दिवसांच्या कालावधीसाठी देण्यांत यावी व क्षुल्लक कारणांमुळे (ज्यांचा उल्लेख ४.५.२ मध्ये नमूद केलेला आहे) कंत्राटदार अपात्र होत असेल तर तत्संबंधी आवश्यक त्या निकषांची पूर्तता या निर्धारित कालावधीत त्यांनी केल्यास त्यांच्या पात्रतेविषयी सक्षम प्राधिकाऱ्यांनी निर्णय घेवून सुधारित पात्र कंत्राटदारांची यादी संकेत स्थळावर प्रसिद्ध करावी व त्यांना निविदा स्पर्धेत भाग घेण्याची परवानगी द्यावी.

२.९.३) **सल्लागार नेमणूक –** इ कोटेशन अतिमआ (वि) - ३१ दि.२२/०४/२०१६ व विविध स्वरूपाच्या कामांसाठी तज्ञ सल्लागार नियुक्ती बाबत मआ/अतिमआ (वि) -९३४८ दि.०४/०२/२०१९

अस्तीवातील मनपा पॅनल वरील तज्ञ सल्लागारयांचे काम निहाय नेमणूक केणेसाठी मा.अति.महापालिका आयुक्त यांची मान्यता घावी. मनपा पॅनल दोन वर्षानी अदयावत करावी.

अन्यथा निविदा OPEN tender असाव्यात यात मनपाकडील नोदणीकृत तसेच शासकीय संस्था कडील नोदणीकृत तज्ञ सल्लागार यांना अनुभव अटी मध्ये पात्र असल्यास सहभाग घेता येईल व मनपाच्या स्थायी समिती मार्फत अथवा मे.महाराष्ट्र शासना मार्फत वेळोवेळी निश्चित केलेला दर यापैकी जो कमी असेल त्यापेक्षा जास्त दर मान्य करणेत येवू नयेत. Payments Terms and Conditions टेंडर मध्ये नमूद

(व्ही. जी. कुलकर्णी)
मुख्य अभियंता
पथ विभाग
पुणे महानगरपालिका

(डॉ. [illegible] खेमनार) भा.प्र.से.
अतिरिक्त महापालिका आयुक्त(इस्टेटस्)
पुणे महानगरपालिका

| | |
|---|---|
| | असाव्यात |
| | २.९.४) सल्लागार नियुक्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने १९९७ साली व तद्नंतर २०१६ मध्ये शासन निर्णय निर्गमित केलेले आहेत. यामध्ये जाहिरात देवून विविध सेवांसाठी सल्लागारांचे पॅनेल तयार करावे असे आदेशित केलेले आहे. शासनाच्या असेही निदर्शनास आलेले आहे की, या Empanelment प्रकियेमुळे जे सल्लागार सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पात्र झाल्यानंतरही Empanel झालेले नाहीत, अशा सल्लागारांना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निविदा प्रकियेत भाग घेता येत नाही. या विषयी सखोल अभ्यास करुन ज्यांच्या बांधकामाच्या निविदेच्याअपंजीकृत कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येईल असे आदेशित केले आहे. विविध सल्लागारांच्या कामाच्या जाहिराती काढतांना या सर्व निविदा सूचनांमध्ये Empanel न झालेल्या सल्लागारांनाही निविदा प्रकियेत भाग घेता येईल अशी तरतूद करावी. यात सर्व सल्लागारांची पश्चातअर्हता बाबतचे नियम स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत आहेत. सल्लागारांच्या निविदा भारतीय कंपनी/फर्म शी संलग्न असलेल्या आंतरराष्ट्रीय सल्लागारांनाही भरता येतील अशी तरतूद निविदेत करावी. वरीलप्रमाणे स्थापत्य **कंत्राटदाराकरिता पंजीकृत नसण्याची अट, विद्युत, यांत्रिकी व बास्तुशास्त्र शाखेच्या कंत्राटदाराकरिता सुद्धा लागू राहील.**<br>सल्लागारांच्या निविदा मागवितानाअनामत रकमेची आवश्यता नाही. निविदा RFP तत्त्वावर करताना QCBS पध्दतीचा वापर करावा. निविदा स्वीकृतीपैकी पात्र सल्लागारातून Performance Security NEFT/RTGSस्वरुपात घेण्यात यावी. |
| | २.९.५) स्थापत्य, विद्युत, यांत्रिकी सर्व कंत्राटदारांना SBD(Standard Bid Document)निविदा बाबत बाबनिहायदरपृथःकरणे सादर करणे अनिवार्य राहिल.<br>ठेकेदाराचा दर १०% व १०% पेक्षा जास्त कमी असल्याम संबंधित ठेकेदाराकडून बाबनिहाय दरपृथ:करण सादर करणे अनिवार्य राहील. |
| | **२.९.६) भाववाढकलम :-**<br>Price Variation clause will be applicable for all works under PMC from day one. In case of items including labour, material component and POL, along with bitumen, concrete and steel, price variation clause will be applicable in 2 form that is 1. General Escalation and 2.Special rise in the bitumen, steel and cement. The basic rate for special rise will be mentioned in the tender document. In case of General Escalation the average indices published by Reserve Bank of India shall be applicable. Escalation shall be paid on quarterly basis.<br>In all other works which do not involve Bitumen, Cement and Steel only General Escalation will be applicable<br>निविदा जाहिरात प्रसिद्धी वेळी निविदा संचात भाववाढ सूत्र फरक अनुज्ञेय होणेसाठी आवश्यक ज्या वर्षाचे दर पत्रक वापरून पुर्वगणकपत्रक तयार करण्यात आलेले आहे त्याचे वर्षाचे बेसिक दर प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. |
| ३ | ३. ई निविदा उघडण्यापूर्वी निविदा प्राधिकाऱ्यानेकरावयाची कार्यवाही |

(डॉ. कुणाल खेमनार) भा.प्र.से.
अतिरिक्त महापालिका आयुक्त(इस्टेटस्)
पुणे महानगरपालिका



(व्ही. जी. कुलकर्णी)
मुख्य अभियंता
पथ विभाग
पुणे महानगरपालिका

३.१यापूर्वी बऱ्याच नामांकित कंत्राटदारांकडून त्यांना निविदा उपलब्ध करुन देण्यात आल्या नसल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. आता ई-निविदा प्रणालीमध्ये लिखीत संकेत स्थळावरुन कोणताही कंत्राटदार कोठूनही निविदा संच प्राप्त करून घेऊ शकेल(Download ) व निविदा सादर करु शकेल (Upload).

४ **४. ई निविदा उघडतांना निविदा प्राधिकाऱ्यानेकरावयाची कार्यवाही**

४.१एक निविदा (Single Tender) बाबत कार्यपध्दती:-

कार्यालयीन परिपत्रक मआ/द/३६९३ दि.२४/०१/२०२० अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

अतिरिक्त सूचना :

१. फक्त प्रथम बोलीच्या वेळेस एकच निविदा प्राप्त झाल्याम कालापव्यय होवू नये म्हणून खातेप्रमुख यांची सदर निविदा फेटाळून फेरनिविदाकाढणेस मान्यता घेणेत यावी व फेरनिविदा प्रसिद्ध करणेत यावी. त्यानंतर निविदा मान्यतेस सादर करताना सदर प्रस्तावात सक्षम अधिकारी यांचीउपरोक्त फेर निविदेच्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यतेचा समावेश करणेत यावा.

२. प्रथम बोलीच्या वेळेस एकही निविदा प्राप्त न झाल्यास मुदतवाढ देणे अथवा फेरनिविदा लावणे याची मुभा खात्यास राहील.मुदतवाढ दिल्यानंतरही एक निविदा प्राप्त झाल्यास सदर निविदा फेटाळून फेरनिविदा मागविण्यात यावी. अशा प्रकरणीफेरनिविदा मागविल्यानंतर एक निविदा प्राप्त झाल्यास निविदेबाबत पुढील कार्यवाही करणेत यावी.

३.उपरोक्त कार्यालयीन परिपत्रकात अटी-शर्ती शिथिल करणे याबाबत मा. सक्षम प्राधिकारी म्हणजे पूर्वगणित निविदा रक्कम ( Estimated cost put to tender ) रु. २५ कोटी पर्यंतच्या कामास संबंधित मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त व रु. २५ कोटी पेक्षा जास्त करिता मा.महापालिका आयुक्त यांची मान्यता घेण्यात यावी.

४.२ तांत्रिक लिफाफ्यातील माहिती अथवा जोडलेल्या विवरणामध्ये काही शंका असल्याम संबंधीतकंत्राटराकडून त्यांचे स्पष्टीकरण घ्यावे, अश्या प्रकरणी पूरक विवरणे/ प्रमाणपत्रे तसेच जास्तीची माहिती प्राप्त करून ती अभिलेखावर ठेवावी व तांत्रिक लिफाफ्यातील माहिती अपुरी आहे. या कारणास्तव कंत्राटदारास अपात्र ठरवू नये. तांत्रिक लिफाफ्यातील माहिती अपूर्ण असल्यास ती वरील प्रमाणे विशिष्ट कालावधीत (८दिवस) उपलब्ध करून देण्याची संधी देण्यात यावी व याकरीता कंत्राटदार असमर्थ ठरल्यास नंतर त्यास अपात्र ठरवावे व तसे त्यास लेखी कळवून नंतर अन्य निविदा उघडण्याची कार्यवाही करावी. निविदेच्या तांत्रिक लिफाफ्यातील माहितीची छाननी करतांनानिविदेच्या गाभ्यातील महत्वाच्याअटींचे पालन होत आहे हे पहावे. स्पर्धात्मक दर प्राप्त होणेसाठी छाननीची मध्यवर्ती कल्पना स्पर्धात्मक दर मिळविणे (True spirit of competition to get competitive rates) हे असावे.

४.३ **तांत्रिक लिफाफ्याच्या पडताळणी अंती पात्र कंत्राटदाराने "माझा आर्थिक देकार उघडण्यात येवू नये" अथवा "मी स्पर्धेतून माघार घेत आहे" असे कळविल्यास ते स्पष्टपणे नाकारण्यात येवून त्याचा आर्थिक देकार उघडण्यात यावा.**

४.४ कंत्राटदार एकमेकांविरुध्द तक्रार करत असतील अथवा हरकती ( Objections ) घेत असतील तर रु. १५ कोटी किंमतीपर्यंतच्या कामांमाठी मा.खातेप्रमुख व रु. १५ कोटी पेक्षा जास्त किंमतीच्या कामासाठी निविदा मा. अति. महा. आयुक्त यांचेकडे आवश्यक कागदपत्रासह संदर्भ करुन निर्णय घ्यावा. मा. अति. महा. आयुक्त यांचा निर्णय दोन्ही बाजूस अंतिम व बंधनकारकराहील अशी अट निविदेत समाविष्ट करण्यात यावी.

**अतिरिक्त सूचना:-**निविदा प्रक्रिये बाबत ठेकेदाराच्या काही तक्रारी / हरकती / म्हणणे असेल तर ते टेंडर उघडल्या पासून ३ कार्यालयीन दिवसांमध्ये संबंधित खात्यामध्ये तक्रारी / हरकती / म्हणणे लिखित

(डॉ. कुणाल खेमनार) भा.प्र.से.
अतिरिक्त महापालिका आयुक्त(इस्टेटस्)
पुणे महानगरपालिका



(व्ही. जी. कुलकर्णी)
मुख्य अभियंता
पथ विभाग
पुणे महानगरपालिका

स्वरूपात सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

४.५ आर्थिक देकार उघडल्यानंतर, निविदा प्रक्रियेत निविदा प्राप्त कंत्राटदाराने अथवा अन्य कंत्राटदारांनी खोटी / बनावट कागदपत्रे तांत्रिक लिफाफ्यास जोडून निविदा मिळवण्याचे / निविदा प्रक्रियेत भाग घेतल्याचे निदर्शनास आल्यास तात्काळ ह्या कंत्राटदारास / कंत्राटदार भागीदारीस अथवा कंपनीस/ संयुक्त कंपनी (JV/LLP / Pvt Ltd / Public Limited Company) असल्यास संबंधीत कंपनीस १५ दिवसांची नोटीस देऊन काळ्या यादीत टाकण्याच्या परिपत्रकाचे प्रारुप मा. महानगरपालिका आयुक्त / मा. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त यांचे कडे सादर करावे व मंजूर करून घेऊन त्यास website वर प्रसिध्दी देऊन पुणे महानगरपालिकेच्या काळ्या यादीत समाविष्ट करावे व पुणे **महानगरपालिकेच्या निविदा प्रक्रियेत भाग घेण्यास प्रतिबंध राहील, ही अट कंपनीचा मालक / संचालक / भागीदार यांना संयुक्त व स्वतंत्रपणे (Combined & several independent liability) लागू राहील. या स्वरूपाची अट निविदा प्रपत्रात समाविष्ट करावी.**

४.६ मनपाकडे खातेस्तरावर मनपाच्या प्रचलित धोरण व निर्देशनानुसार कार्यवाही बाबत सूचना:-
अनेक वेळा कंत्राटदार निविदा प्रक्रियेत पात्र होण्यासाठी शासनाचे इतर विभाग / केन्द्र शासनाचे विभाग / नगर पालिका / नगर परिषदा / सनदी लेखापाल / खाजगी वास्तुशास्त्रज्ञ / प्राचार्य / सार्वजनिक उपक्रम इ. अनेक संस्थांकडून प्रमाणपत्रे (work done or experience certificate ) प्राप्त करीत असल्याचे निदर्शनास येत आहे. अश्या वेळेस शंका असल्यास / तक्रार प्राप्त झाल्यास प्राप्त प्रमाणपत्रातील माहितीची खातरजमा ( Verification ) व सत्यता प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यावरील अधिकाऱ्यांकडून प्रमाणित करून घ्यावी. (उदा. MSRDC च्या EE / SE नी contracts दिले असल्यास व त्याविषयी शंका असल्यास / तक्रार प्राप्त झाल्यास CE-MSRDC/JMD- MSRDC यांचेकडून खात्री करून चुकीचे / दिशाभूल करणारे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर व संबंधीत कंत्राटदारावर दंडनीय कारवाई न केल्यास संबंधित निविदा उघडणाऱ्या अधिकारी यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी).

४.७ निविदा प्रकरणात शासन स्तरावर सर्वसाधारण व्यक्ती / लोक प्रतिनिधी यांची तक्रार प्राप्त झाल्यास मा. महानगरपालिका आयुक्त / मा. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त यांचेमार्फत अहवाल सादर करण्यात यावा व इतर बाबतीत खातेस्तरावर निविदा तक्रारी बाबत माहिती /अहवाल संबंधीताना दिला जावा .

४.८ निविदांच्या तांत्रिक लिफाफा क्र.१ ची छाननी व मुल्यांकन खात्याचे स्तरावर करण्यात यावी.:-

सध्याच्या प्रचलित पध्दतीत निविदा कार्यकारी अभियंता व अधीक्षक अभियंता यांच्या स्तरावर उघडल्या जातात व अश्या निविदांच्या तांत्रिक लिफाफा क्र.१ ची छाननी त्यांचे स्तरावर होऊन लिफाफा क.२ उघडणेबाबत निर्णयही कार्यकारी/अधीक्षक अभियंता/ खातेप्रमुख घेतात. या पध्दतीत बदल करण्यात येत आहेत. व यापुढे,खाली परीछेद क्र.५.१.४ प्रमाणे नमूद केल्याप्रमाणे ह्या निविदांची पडताळणी होईल.

निविदा पडताळणीसाठी खालीलप्रमाणे कामकाज करावे.

४.८.१.निविदा उघडल्यानंतर त्यांनी निविदेची छाननी करुन यासाठी निविदेच्या पात्रते/अपात्रते विषयी



(डॉ. कुणाल खेमनार) भा.प्र.से.
अतिरिक्त महापालिका आयुक्त(इस्टेटस्)
पुणे महानगरपालिका

(व्ही. जी. कुलकर्णी)
मुख्य अभियंता
पथ विभाग
पुणे महानगरपालिका

| | |
|---|---|
| | काही शंका निर्माण झाल्यास, विशेषतः खालील बाबींवर त्यांनी कत्राटदारांकडून स्पष्टीकरण मागविणे अनिवार्य राहील.<br>(१) नोंदणी विषयक कागदपत्रे<br>(२) पॉवर ऑफ ॲटर्नीबाबतची स्पष्टीकरणे<br>(३) बँक प्रतीभूती हमी मधील त्रुटी<br>(४) कंत्राटदाराने सादर केलेल्या तांत्रिक व आर्थिक विवरणात संदिग्धता व त्रुटी आढळत असल्यास त्याबाबत स्पष्टीकरण<br>(५) पुलाची लांबी व विनिर्देश, समान कामे, इमारतींची उंची व कामाचे गुणवत्ता निकष, रस्ते बांधकामातील कामांचे/बाबींचे परिमाण व शुल्क<br>**(६) जॉइंटव्हेंच्यूअर (Joint Venture) असल्यास त्यासंबंधी करारनाम्यात त्रुटी असणे, प्रमाणित नसणे, करारनामा नोंदविलेला नसणे, भागीदाराचे शेअर नमूद नसणे.**<br>(७) आर्थिक ताळेबंद व विवरणातील त्रुटीबाबतचे स्पष्टीकरण<br>(८) तांत्रिक लिफाफ्यातील सादर केलेले प्रस्ताव/ कागदपत्रातील अटी/शर्ती व पत्र व्यवहारातील संदिग्धता, अस्पष्टता इत्यादि.<br>याबाबत निविदा उघडणाऱ्या सक्षम अधिकाऱ्यांनी (कार्यकारी अभियंता/अधीक्षक अभियंता/खातेप्रमुख) संबंधीत कंत्राटदारास पात्र/अपात्र ठरविण्यापूर्वी त्यांचेबरोबर लिखित स्वरुपात पत्रव्यवहार करावा व कंत्राटदारा कडून लिखित स्वरुपात स्पष्टीकरण घेऊन ते पडताळावे. किरकोळ व महत्व नसलेल्या अटीमुळे निविदाकरास अपात्र करण्यात येऊ नये. अशा ठिकाणी कंत्राटदाराकडून लेखी स्पष्टीकरण घ्यावे व अटीनुसार दुरुस्त कागदपत्रे प्राप्त करुन समितीसमोर ठेवून त्याची छाननी करुन कंत्राटदाराच्या निविदा पात्रता/अपात्रते विषयी निर्णय घ्यावा. याबाबतचे सर्व अभिलेख धारिकेत व संकेत स्थळावर ठेवावे व निविदा स्विकृतीसाठी सादर करण्याच्या प्रस्तावात या सर्व पडताळणी पध्दतीचा स्पष्ट उल्लेख करावा. |
| | **४.९ पुर्वगणित निविदा रक्कम (Estimated cost put to tender) पेक्षा कमी दराने असलेल्या निविदा प्राप्त झाल्यास त्यांच्या स्विकृती संदर्भात सुधारीत मार्गदर्शक सूचना**<br>४.९.१. निविदा प्रक्रियेमध्ये प्राप्त निम्नतम निविदेचा देकार **पुर्वगणित निविदा रक्कम (Estimated cost put to tender) पेक्षा १०% व त्यापेक्षा जास्त कमी** असेल तर संबंधित कंत्राटदाराकडून एवढया कमी दरात काम करण्याचे नियोजना बाबत सविस्तर तपशील निविदा बोलाविणा-या अधिका-याने प्राप्त करुन घ्यावा. कंत्राटदाराने दिलेल्या तपशीलाच्या आधारे सदर काम निम्नतम देकाराच्या किंमतीत पूर्ण करता येणे शक्य असल्याची खात्री करुन घेण्यात यावी.<br>४.९.२.प्राप्त निम्नतम निविदेचा देकार **पुर्वगणित निविदा रक्कम (Estimated cost put to tender) पेक्षा कमी** असेल तर-<br>**१) अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम (Additional Performance Security Deposit)**<br>निविदेच्या लिफाफा क्र.२ मध्ये सादर करण्याबाबतच्या सूचना रद्द करण्यात येत असून लिफाफा क्र. १ व लिफाफा क्र.२ उघडल्यानंतर प्रथम न्यूनतम देकार सादर करणा-या L-१ निविदाकाराने महापालिका आयुक्त यांचे नावे असलेला "Additional Performance Security Deposit" आठ दिवसाच्या आत संबंधित खात्याकडे जमा करण्याबाबतच्या अटीचा समावेश या पुढील निविदामध्ये करण्यात यावा व निविदेबाबत पुढील कार्यवाही करावी. ही आठ दिवसांची मुदत कोणत्याही कारणासाठी शिथीलक्षम असणार नाही. त्यामुळे अशा प्रकरणी कार्योत्तर मंजुरीचे प्रस्ताव सुध्दा सादर करण्यात येऊ नये, |

(व्ही. जी. कुलकर्णी)
मुख्य अभियंता
पथ विभाग
पुणे महानगरपालिका

(डॉ. कुणाल खेमनार) भा.प्र.से.
अतिरिक्त महापालिका आयुक्त(इस्टेट्स)
पुणे महानगरपालिका

२)प्रथम न्यूनतमदेकाराच्या (L-१) निविदाकाराने वरील विहित मुदतीत Additional Performance Security Deposit चा भरणा केला नाही तर द्वितीय न्यूनतम देकाराच्या (L-२) निविदाकारास लेखी विचारणा करावी व L-२ निविदाकार L-१ पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असतील तर त्यांची निविदा मंजूर करावी.

३) देकार १५% पेक्षा कमी दराचा असल्यास उर्वरीत रकमेसाठी दोन पटीने रक्कम डीडी द्वारे सादर करणे अनिवार्य राहील. उदा. १९ % कमी दरासाठी खालीलप्रमाणे पृथ:करण :-

१०% कमी दरापर्यंत १% (देकार अँटपार पेक्षा जास्त कमी ते १०% कमी दरापर्यंत असल्यास १%(एक टक्का) रक्कम NEFT/RTGS द्वारे भरणा करणे अनिवार्य राहील.)

व

१५ % पर्यंत कमी दरापर्यंत - (१५% - १० % = ५% )

तसेच (१९-१५) = ४% करीता (४X२=)८%

असे एकूण (१+५+८) = १४%)

Additional Performance Security Deposit ची रक्कम रुपये १०००/- पेक्षा कमी असल्यास किमान रुपये १०००/- (एक हजार) चा NEFT/RTGS द्वारे भरणा करणे अनिवार्य राहिल.

४. Additional Performance Security Deposit ची रक्कम भरताना कंत्राटदाराची निविदा देकार दोन दशांश पर्यंत ग्राह्य धरुन (Rounded up to two decimal points) त्याप्रमाणे रक्कम परिगणीत करण्यात यावी.

कंत्राटदाराने समाधानकारकरित्या काम पूर्ण केल्यानंतर Additional Performance Security Deposit परत करण्यात यावे. कंत्राटदाराने समाधानकारकरित्या काम पूर्ण केले असल्याबाबत संबंधीत कार्यकारी अभियंता / खातेप्रमुख यांनी अभिलेखीत करावे.

काम समाधानकारकपणे पुर्ण झाल्यावर निविदेतील तरतुदींप्रमाणे ठेकेदारांकडून प्राप्त अतिरिक्त कामगिरी सुरक्षा ठेव रक्कम ३ महिन्याच्या आत कंत्राटदारांना खात्या मार्फत परत करावी.

१. अतिरिक्त सूचना :- न्युनतम देकार (एल-1) ठेकेदाराने विहीत मुदतीत Additional performance security deposit चा भरणा न केल्यास L-1 ठेकेदारास १ वर्ष पुणे महानगरपालिकेची कामे घेण्यासाठी बंदी करणे तसेच त्यानुसार कार्यालयीन परिपत्रक काढणेची जबबदारी संबधित खात्याची राहील. व त्याची बयाना रक्कम जप्त करण्यात येईल <u>तसेच सदर ठेकेदारास अपात्र समजले जाईल</u>.

४.९.३) सदर Additional Performance Security Deposit ची रक्कम संबंधित ठेकेदाराच्या बँक खात्या मधून NEFT/RTGS द्वारे भरणा करणे अनिवार्य राहिल .

(i) वरील पध्दतीमध्ये खोटी कागदपत्रे/ NEFT/RTGS सादर करणा-या कंत्राटदारांची अनामत रक्कम (EMD) जप्त करण्यात यावी व संबंधीत कंत्राटदारांना काळया यादीत टाकावे व कायदेशीर कारवाई करावी . तसेच अशा काळया यादीत समाविष्ट केलेल्या कंत्राटदारांनी सादर केलेल्या निविदा उघडू नयेत.

(डॉ. कुणाल खेमनार) भा.प्र.से.
अतिरिक्त महापालिका आयुक्त(इस्टेट्स)
पुणे महानगरपालिका



(व्ही. जी. कुलकर्णी)
मुख्य अभियंता
... विभाग
पुणे महानगरपालिका

५. ई निविदा स्विकृती

ई निविदा वेबसाईट, वेब पोर्टलवर प्रसिध्द झाल्यानंतर निविदेतील अटी व शर्तीमध्ये अंशत:ही बदल करण्यात येऊ नये. अशा बदलामुळे कंत्राटदार आणि सर्वसामान्य जनता यांच्यामध्ये कार्यपध्दती बाबत संशय निर्माण होतो. तसेच विश्वासार्हतेला तडा पोचण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे ई निविदेतील आशय अथवा तारखेत बदल करावयाचे झाल्यास ते सक्षम प्राधिकाऱ्याच्या लिखित पूर्वपरवानगीनेच करण्यात यावेत. अशा मंजूरी प्रदान करतांना सदर बाबतचे पत्र व त्याची कारणेही ठळकपणे संबंधित वेबसाईटवर ठळकपणे प्रसिध्द करण्यात यावे.

**५.१.२निविदेच्या विधीग्राह्यता कालावधी- (Validity Period )** निविदेतील कंत्राटदाराने भरलेल्या दरासाठी विधिग्राह्यता कालावधी निविदा स्वीकृती च्या अंतिम दिनांकपासून १२० दिवस असावा. तथापि निविदेची विधीग्राह्यता निविदेत नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहिल. आवश्यकता असल्यास कंत्राटदाराकडून निविदा विधीग्राह्यता वाढवून घेण्यात यावी.

**५.१.३ई- निविदा उघडण्याची प्रक्रिया कार्यालयीन वेळेत करणे.** ई-निविदा प्रक्रिया ही शासनाने मंजूर केलेल्या ऑनलाईन प्रणालीव्दारे प्रदर्शित करण्यात येते. सदर प्रक्रियामध्ये निविदा कार्यालयीन वेळेत न उघडणे, कंत्राटदाराचे अनुपस्थितीत उघडणे अशा तक्रारी होऊ नयेत म्हणून ज्या कंत्राटदारानी निविदा सादर केल्या आहेत अशा बहुसंख्य कंत्राटदारांसमोर निविदा उघडण्याची कार्यवाही करण्यात यावी व अशा निविदा कार्यालयीन वेळेतच उघडण्यात याव्यात. काही अपवादात्मक परिस्थितीत सदरच्या निविदा कार्यालयीन वेळेत उघडणे शक्य नसल्यास संबंधित निविदाधारकास आगाऊ सूचना देऊन अशा निविदा कार्यालयीन वेळेनंतर उघडण्यात याव्यात. कार्यालयीन वेळेनंतर निविदा उघडण्याच्या प्रक्रियेमध्ये संबंधित निविदाधारकारांची किंवा किमान २ स्वतंत्र व्यक्तींची उपस्थिती अनिवार्य राहिल. यामुळे निविदा उघडण्याच्या प्रक्रियेमध्ये पारदर्शकता राहिल.

**५.१.४ निविदा पडताळणी पद्धत (Evaluation)**

.खातेस्तरावर पडताळणी करण्यात यावी.( अ – पाकीट छाननी / तांत्रिक लिफाफा )

1. र.रु. ५ कोटी पर्यतच्या निविदा तांत्रिक तपासणी मान्यतेचा अधिकार कार्यकारी अभियंता यांचा राहील.
2. र.रु. ५ कोटी ते १० कोटीच्या निविदा तांत्रिक तपासणी मान्यतेचा अधिकार अधिक्षक अभियंता यांना राहील.
3. र.रु.१०कोटी च्या वरील निविदा तांत्रिक तपासणी मान्यतेचा अधिकार मुख्य अभियंता यांनाराहील.

अतिरिक्त सूचना :-१. क्षेत्रीय स्तरावर निविदा तांत्रिक तपासणी मान्यतेचा अधिकार खातेप्रमुख यांना राहील.

**२.निविदेतील लिफाफा क्र.१ मध्ये तसेच निविदा मंजुरी व नंतर देयके अदा करताना जोडलेली कागदपत्रे खोटी व बनावट असल्याची बाब निदर्शनास आल्यास ठेकेदार पुर्णपणे जबाबदार राहतील, पुणे महानगरपालिकेचे निविदा छाननी करणारे अधिकारी जबाबदार राहणार नाहीत.**

५.१.५ निविदा मान्यतेचे अधिकार

मआ /मुले १२९६ दि.११/१०/२०११ अन्वये खालील तरतूद प्रमाणे निविदा मान्यतेचे अधिकार

| अ. क्र. | प्राधिकारी | अर्थसंकल्पीय तरतुदीस अधीन निविदा मान्य मर्यादा रक्कम |
|---|---|---|
| १ | मा.अति.महा.आयुक्त (जनरल/विशेष) | --- |

(व्ही. जी. कुलकर्णी)
मुख्य अभियंता
पथ विभाग
पुणे महानगरपालिका

(डॉ. कुणाल खेमनार) भा.प्र.से.
अतिरिक्त महापालिका आयुक्त(इस्टेट्स)
पुणे महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| २ | खातेप्रमुख/अधीक्षक अभियंता<br>१. तांत्रिक<br>२.प्रशासकीय | रुपये १० लाख ते २५ लाखापर्यंत |
| ३ | क्षेत्रिय आयुक्त | रुपये ५ लाख ते १० लाख पर्यंत |
| ४ | क्षेत्रिय अधिकारी | रुपये १ लाख ते ५ लाख पर्यंत |
| ५ | कार्यकारी अभियंता | रुपये १ लाख ते १० लाख पर्यंत |
| ६ | उप अभियंता | रुपये १ लाख पर्यंत |

र.रु. २५ लक्ष वरील निविदा मा. महापालिका आयुक्त व मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त ज/वि/ई यांचेमार्फत मा. स्थायी समिती यांचेकडे मान्यतेसाठी सादर होतात.

वरील तक्त्यातील अ.क्र.१ मधील प्राधिकारी मा.अति.महा.आयुक्त(जनरल/विशेष) ऐवजी मा.अति.महा.आयुक्त (जनरल/विशेष/इस्टेट) असे वाचावे.

**५.२ वस्तु व सेवा कर (GST):-**

**१) वस्तु व सेवा करासंबंधी कंत्राटदारांनी त्या पृष्ठयर्थ परिपूर्ण कागदपत्रे सादर केल्यानंतर संबंधित खाते यांनी Taxes / Cess या बाबी आवश्यकतेनूसार वगळून देयकांची छाननी करुन ३० दिवसांमध्ये संबंधीत देयके कंत्राटदारास अदा करावीत.**

**२) राज्य शासन / पुणे महानगरपालिकेच्या दरसुचीमधील विविध बाबीचे दर हे वस्तू व सेवा कर वगळून असावेत. पुर्वगणकपत्रके / अंदाजपत्रके तयार करताना प्रचलित वस्तु व सेवा कर + रॉयल्टी चार्जेस + टेस्टिंग चार्जेस+वर्क इन्शुरन्स+लेबर सेस इ. लागू होणाऱ्या बाबी स्वतंत्रपणे आवश्यकतेनुसार दर्शवून अंतर्भुत कराव्यात.**

**३) उपरोक्त अ.क्र.२ नुसार लागू होणाऱ्या बाबी वगळून येणाऱ्या किंमतीवर आधारित कामांच्या निविदा मागविण्यात याव्यात.**

**५.३ यंत्रसामुग्री:-**

**१) यंत्रसामुग्रीसाठी स्वत:च्या मालकीच्या जागेची अट टाकण्यात येऊ नये.**

**२) कामांसाठी नवीन यंत्रसामुग्रीचे आयुर्मान १५ वर्षे गृहीत घरण्यात यावे.**

**३) पहिल्या १० वर्षाकरीता अधीक्षक अभियंता (यांत्रिकी) यांच्या योग्यता प्रमाणपत्राची आवश्यकता नाही.**

**४) १० वर्षांनंतर प्रतिवर्षी अधीक्षक अभियंता (यांत्रिकी) यांचे योग्यता प्रमाणपत्र आवश्यक राहील.**

५. दि.२७-०९-२०१८ शासन निर्णयातील परिच्छेद ५.३ मध्ये यंत्रसामुग्रीबाबत नमूद केले आहे. यामध्ये (२) अंतर्गत कामांसाठी नवीन यंत्रसामुग्रीचे आयुर्मान १५ वर्षे गृहीत धरण्यात येण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. तथापि, परिवहन विभागाने १५ वर्षापुढील सुस्थितीतील वाहनांना परवाना दिल्यास सदरची यंत्रसामुग्री ग्राहय धरण्यात यावी.

अतिरिक्त सूचना :-देय कामांसाठी कंत्राटदाराकडे उपलब्ध असावयाची स्वत:च्या मालकीची यंत्रसामुग्री अथवा स्वंसाक्षांकित व नोटरीकृत भाडेतत्वावर घेतलेली यंत्रसामुग्री व प्रकल्प व्यवस्थापनाबाबतची व्यवस्था याचे निकष खातेप्रमुख यांनी प्रत्येक प्रकरणी तपासणी करून निश्चित करावी.

कामाच्या स्वरूपानुसार लागणारी यंत्रणा समुग्री SBD(Standard Bid Document) मध्ये प्रकरण निहाय समाविष्ट करणेची कार्यवाही खाते प्रमुख यांचे मार्फत मान्य करून टाकणे येईल .

६. (Defect Liability Period)

संबधित मुख्य विभागाकडून SBD (Standard Bid Document) मध्ये दोष दायित्व कालावधी (Defect Liability Period )निर्धारीत करून नमूद करणेत यावा.

७. अन्य बाबतीत असेही आढळून आहे आहे की, कांही कंत्राटदार निविदा सादर केल्यानंतर म्हणेच Bid lock झाल्यानंतर तांत्रिक लिफाफा उघडताना त्यांचा लिफाफा क्र.२ उघडण्यात येऊ नये असे लेखी पत्राव्दारे

(डॉ. कुणाल खेमनार) भा.प्र.से.
अतिरिक्त महापालिका आयुक्त(इस्टेट्स)
पुणे महानगरपालिका

(व्ही. जी. कुलकर्णी)
मुख्य अभियंता
[illegible] विभाग
पुणे महानगरपालिका

| | |
|---|---|
| | निविदा समितीत/संबंधितांस कळवितात, त्यामुळे कंत्राटदारांचे संगनमत (Cartel Formation) झाले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशावेळी संबंधित कंत्राटदाराचा लिफाफा क्र.२ उघडण्यात यावा व आर्थिक देकार उघडल्यानंतर संबंधित कंत्राटदार पात्र ठरल्यास कार्यारंभ आदेश देण्यासंदर्भात नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी. जर कंत्राटदाराने कामकरण्यास असमर्थता दर्शविल्यास त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन अशा कंत्राटदारास पुणे मनपातील सर्व निविदा प्रक्रीयेत भाग घेण्यास एका वर्षासाठी प्रतिबंध करण्यात यावा, यासंबंधी संबंधित खातेप्रमुख यांना पूर्ण अधिकार राहतील. अशा निविदा प्रक्रीयेमध्ये अल्प कालावधीची फेरनिविदा मागवून पुढील आवश्यक कार्यवाही करावी. |
| ८. | In case the lowest tendered amount of two or more contractors is same<br>4B In case the lowest tendered amount (esimated cost+ amount worked on the basis of percentage above/below ) of two or more contractors is same ,such lowest contractors will be asked to submit sealed revised offer in the form of letter mentioning percentage above/ below on estimated cost of tender including all sub sections /sub heads as the case may be ,but the revised percentage quoted above/ below on tendered cost or on each sub section / sub head should not be higher than the percentage quoted at the time of submission of tender.The lowest tender shall be decided on the basis of revised offers.<br>In case any of such contractor refuses to submit revised offer, then it shall be treated as withdrawal of his tender before acceptance and 50% of earnest money shall be forfeited.<br>If the revised tendered amount of two or more contactors received in revised offer is again found to be equal, the lowest tender ,among such contactors ,shall be decided by draw of lots in the presence of of the circle, EE(s)/ incharge of work. |
| .९ | महाराष्ट्र शासन यांचेकडील नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंता ठेकेदारांना खालीलप्रमाणे अटी-शर्ती सवलत लागू राहील.-<br>सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना सर्वसाधार अनेक ठिकाणी देण्यात आलेल्या सवलती चा आभ्यास करून व आवश्केतनुसार त्यामध्ये अल्पसा बदल करून पुणे महानगरपालिकेत पुढीलप्रमाणे अंमलबजवणी करणेत येणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेमार्फत दीड कोटी मार्यादेपर्यत कामे करणेसाठी नोंदणीप्रमाण पत्र देण्यात आले आहेत. तथापी पुणे मनपाकडील कार्यक्षेत्र व कामांचे स्वरूप या बाबींचा विचार करता थेट १.५० कोटीपर्यंतची कामे न देता प्रथम सुशिक्षित बेरोजगार यांना २५ लाखापर्यतच्या कामांसाठी निविदा सादर करणेस पात्र राहतील. उर्वरित सवलती खालीलप्रमाणे आहेत.<br>१. सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे नोंदनी करून नोंदणी प्रमाणपत्र निविदा भरताना सादर केल्यास, एक काम र.रू.२५ लाख किंवा जास्तीत जास्त सहा कामे असे एकुण रक्कम रूपये १.५० कोटी मर्यादेपर्यंतची कामे |

(डॉ. कुणाल खेमनार) भा.प्र.से.
अतिरिक्त महापालिका आयुक्त (इस्टेटस्)
पुणे महानगरपालिका

मुख्य अभियंता
पुणे महानगरपालिका

| | |
|---|---|
| | घेता येतील. या कामांसाठी अनुभव , उलाढाल या अटीमध्ये सूट देणेत येऊन निविदा भरणेसाठी पात्र समजणेत येईल.<br>२. सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना सर्व कामांना सुरक्षा अनामत रकमेमध्ये देणात येणारी ५०% सुटबाबतची अट रद्द करणेत येऊन मुद्दा १ नुसार प्रथम मिळालेल्या सहा किंवा र.रू.१.५० कोटी पर्यंतच्या कामांसाठी अनामत रकमेमध्ये ५०% सुट अनुज्ञेय राहील. पुढील निविदासाठी सर्वसाधारण ठेकेदारांप्रमाणे ५% सुरक्षा अनामत निविदा अटी शर्ती प्रमाणे भरावी लागेल.<br>सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना यापुर्वी एकही काम मिळालेले नाही अथवा मिळालेल्या निविदा कामांची माहिती बंधपत्रपत्राव्दारे सादर करणे बंधनकारक राहील. तथापि सदर सुशिक्षित बेरोजगार अभियंता हि सवलत यांना र.रु. १.५ कोटी पर्यतच कामासाठी अथवा नोंदणी दिनांका पासून पाच वर्ष पर्यत राहील त्यापैकी जे प्रथम येईल तो पर्यतच सदर सवलत लागु राहिल. |
| १० | इ-निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र५००/- रुपयांच्या स्टँम्प पेपरवर ठेकेदाराने लिफाफा क्र.१ मध्ये जोडणे बंधनकारक आहे.<br>• निविदेतील लिफाफा क्र.१ मध्ये तसेच निविदा मंजुरी व नंतर देयके अदा करताना जोडलेली कागदपत्रे खोटी व बनावट असल्याची बाब निदर्शनास आल्यास ठेकेदार पुर्णपणे जबाबदार राहतील, पुणे महानगरपालिकेचे निविदा छाननी करणारे अधिकारी जबाबदार राहणार नाहीत.<br>• खोटया व बनावट कागदपत्राआधारे निविदा भरली असल्याचे उघड झाल्यास सदर ठेकेदाराची बयाना रक्कम जप्त करण्यात येईल.<br>• ठेकेदाराने जोडलेली कागदपत्रे खोटी व बनावट आढळल्यास अशा ठेकेदाराची निविदा अपात्र ठरविण्यात येऊन त्यास काळया यादीत टाकण्याची तसेच सदर ठेकेदारा विरूध्द भा.दं.वि.सं. अंतर्गत फौजदारी गुन्हा नोंदविण्याची कारवाई करण्यात येईल कार्यारंभ आदेश दिल्यानंतर ठेकेदाराने जोडलेली कागदपत्रे खोटी व बनावट आढळुन आल्यास त्यासाठीही संबंधित ठेकेदार भा.दं.संहितेच्या विविध कलमाप्रमाणे कारवाईस पात्र राहतील. अशा निविदेतील कामे प्रारंभिक स्तरावर असल्यास निविदा रद्द करून ठेकेदारास काळया यादीत टाकण्यात येईल. |
| ११ | १५.वार्षिक स्वरुपाची भांडवली व देखभाल दुरुस्तीची कामे मुदतीत करणे अपेक्षित असलेने कनिष्ठ अभियंता/उप अभियंता यांनी सूचित केलेल्या कालावधीतच कामे पुर्ण करणे बंधनकारक |



(डॉ. कुणाल खेमनार) भा.प्र.से.
अतिरिक्त महापालिका आयुक्त(इस्टेटस्)
पुणे महानगरपालिका

(व्ही. जी. कुलकर्णी)
मुख्य अभियंता
पथ विभाग
पुणे महानगरपालिका

राहील. सदर कालावधीत काम न झाल्यास प्रती दिन निविदा रकमेनिहाय खालीलप्रमाणे दंडात्मक कार्यवाही निविदा अटीप्रमाणे केली जाईल. अशा स्वरुपाची कामे करताना ठेकेदार यांनी किंवा त्यांचे जबाबदार अधिकृत प्रतिनिधी कनिष्ठ अभियंता/उप अभियंता यांचेशी नियमित संपर्क व समन्वय राखणे आवश्यक आहे. व केलेल्या कामाचा संक्षिप्त अहवाल सादर करणे बंधनकारक राहिल.

| No. | Detils | Amount |
|---|---|---|
| 1. | Amount of liquidated daamages for delay in completion of works | For whole of work (1/2000) th of the initial contract price, rounded off to the nearest Thousand, per day. |
| 2. | Maximum limit of liquidated daamages for delay in completion of works | 10 perecent of the initail contract price rounded off to the nearest thousand. |

प्रतिदीन दंड मुळ कामाच्या रक्कमेच्या १/२००० प्रमाण इतकी (म्हणजे ०.०५% व नजीकच्या एक हजारांच्या पुर्णांकात ) आणि दंडाची कमाल रक्कम मर्यादा १०.०० % इतकी अशा प्रकारे राहील.

महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका